


# कृषि महाविद्यालय, कोल्हापूर
# वार्षिक अहवाल- २०१६-१७

## १. प्रस्तावना :

कृषि महाविद्यालय, कोल्हापूर सन १९६३ साली स्थापन झाले. या महाविद्यालयात बी.एस्सी (कृषि) हा पदवीपूर्व अभ्यासक्रम एम .एस्सी (कृषि) हा पद्व्युत्तर अभ्यासक्रम राबविला जातो. या शिवाय या महाविद्यालयात गरजेनुसार व प्रश्नाभिमुख संशोधन कार्यक्रम राबविण्यात येतो. तसेच या विभागातंर्गत सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हयातील शेतकऱ्यांसाठी विद्यापीठाने नव्याने विकसीत केलेल्या सुधारीत कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी विस्तार शिक्षण विषयक विविध उपक्रम राबविण्यात येतात.

## २. शिक्षण व विद्यार्थ्यांचे कार्यक्रम:

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात एकुण ८९९ विद्यार्थी चार वर्षाच्या बी.एस्सी (कृषि) व १०४ विद्यार्थी दोन वर्षाच्या एम.एस्सी (कृषि) या अभ्यासक्रमात शिक्षण घेत होते. महाविद्यालयातील कृषिविद्या, कृषि वनस्पतीशास्त्र, किटकशास्त्र, विस्तार शिक्षण विभाग, वनस्पतीरोगशास्त्र विभाग, कृषि सुक्ष्मजीवशास्त्र विभाग, कृषि अर्थशास्त्र विभाग उद्यानविद्या विभाग, मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभाग या विभागामध्ये पदव्युत्तर शिक्षणाची सोय उपलब्ध आहे. या महाविद्यालयात शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुखसुविधा, प्रयोगशाळा इत्यादी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

### २.१ प्रवेश :

विद्यापीठाने ठरविलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार सबंधित सत्रामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. प्रथम वर्षासाठी प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना कृषि महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या शैक्षणिक पध्दतीचा/उपक्रमाचा तसेच विविध विषयांचे विभाग/प्रक्षेत्रे/ परीक्षा पध्दती मुल्यमापन, प्रयोगशाळा, प्राध्यापक वर्ग इत्यादी विषयक माहिती होण्याच्या दृष्टिने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांसाठी कृषि महाविद्यालयामध्ये प्राध्यापक विद्यार्थी/पालकत्व योजना राबविली जाते. महाविद्यालयातील सन २०१६-१७ मधील विद्यार्थी संख्या पुढीलप्रमाणे.

**पदवी अभ्यासक्रम**

| अ.न | तपशील | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | प्रथमवर्ष बी.एस्सी (कृषि) | ११६ | १३० | २४६ |
| २. | व्दितीय वर्ष बी.एस्सी (कृषि) | ११० | १२१ | २३१ |
| ३. | तृतीय वर्ष बी.एस्सी (कृषि) | ९७ | ११४ | २११ |
| ४. | चतुर्थ वर्ष बी.एस्सी (कृषि) | ८५ | १२६ | २११ |
| | एकुण | ४०८ | ४९१ | ८९९ |

**पदव्युत्तर अभ्यासक्रम**

| अ.न | तपशील | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | प्रथमवर्ष एम. एस्सी (कृषि) | ३२ | १९ | ५१ |
| २. | व्दितीय वर्ष बी.एस्सी (कृषि) | ३७ | १६ | ५३ |
| | एकुण | ६९ | ३५ | १०४ |

महाविद्यालयातील बी.एस्सी. (कृषि) या चार वर्षाच्या अभ्यासक्रमांतर्गत सत्र पध्दतीनुसार विविध विषयांचे बौध्दिक व प्रात्याक्षिक वर्ग नियमीतपणे घेण्यात आले.

**२.२ परीक्षा मुल्यमापन व निकाल :**

कृषि महाविद्यालय पातळीवर घेतली जाणारी विविध विषयांची सत्रानुसार मध्य सत्र परीक्षा (Mid Term Exam) विद्यापीठाने ठरवून दिलेल्या कार्यक्रमानुसार पार पाडण्यात आली. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद पुणे मार्फत घेतली जाणारी सामूहिक बौध्दीक व प्रात्याक्षिक अंतीम परीक्षा घेण्यात आली.

**२.३ शिष्यवृत्ती व सवलती :**

या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना भारत सरकारकडून मिळत असलेल्या व विद्यापीठाच्या विविध शिष्यवृत्ती/सवलती दिल्या जातात.

**सन २०१६-१७ या वर्षातील शिष्यवृत्ती/सवलतीचा तपशील**

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्ती नांव** | **शिष्यवृत्ती मिळणाऱ्या विद्यार्थ्याची संख्या** |
|---|---|---|
| ०१ | अनुसुचित जाती शिष्यवृत्ती | ८३ |
| ०२ | विमुक्त / भटक्या जमाती शिष्यवृत्ती | ८५ |
| ०३ | अनुसूचित जमाती शिष्यवृत्ती | ३२ |
| ०४ | इतर मागास वर्गीय शिष्यवृत्ती | १३१ |
| ०५ | विशेष मागास वर्गीय शिष्यवृत्ती | ०५ |
| ०६ | अनुसुचित जाती फ्रि-शीप | २५ |
| ०७ | विमुक्त / भटक्या जमाती फ्रि-शीप | १५ |
| ०८ | अनुसूचित जमाती फ्रि-शीप | ०८ |
| ०९ | इतर मागास वर्गीय फ्रि-शीप | २९ |
| १० | विशेष मागास वर्गीय फ्रि-शीप | ०३ |
| ११ | महाविद्यालय गुणवत्ता शिष्यवृत्ती | ८० |
| १२ | भारतीय कृषि अनुसंधान परिषद (मिरीट-कम-मीन्स) नविन शिष्यवृत्ती | ०७ |
| १३ | भारतीय कृषि अनुसंधान परिषद (मिरीट-कम-मीन्स) नुतनीकरण शिष्यवृत्ती | २० |
| १४ | भारतीय कृषि अनुसंधान परिषद (राष्ट्रीय गुणवत्ता ) शिष्यवृत्ती | ३५ |
| १५ | भारतीय कृषि अनुसंधान परिषद (ज्युनियर रिसर्च फेलोशिप ) शिष्यवृत्ती | - |
| १६ | अपंग शिष्यवृत्ती | ०६ |
| १७ | माजी सैनिक शिष्यवृत्ती | ०१ |
| १८ | फिनोलेक्स सिल्वर जुबली ट्रॉपी शिष्यवृत्ती | ०३ |
| १९ | सेंट्रल सेक्टर स्किम शिष्यवृत्ती | ४८ |
| २० | अल्पसंख्याक शिष्यवृत्ती | ०१ |

## २.४ वसतिगृह :

कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे कृषि पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांची वसतिगृहाची सोय उपलब्ध आहे. सन २०१६-१७ या वर्षात १२ पाणी शुध्दीकरण उपकरणे ०३ पाण्याच्या टाक्या व एक वॉटर कुलर यांची उपलब्धता विद्यार्थ्यांना शुध्द पाणी मिळावे यासाठी करण्यात आली आहे. सन २०१६-१७ मधील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचा तपशील खालील प्रमाणे

**पदवी अभ्यासक्रम वसतिगृह**

| अ.क्र. | तपशील | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथमवर्ष बी.एस्सी (कृषि) | ७८ | ७३ | १५१ |
| २ | व्दितीय वर्ष बी.एस्सी (कृषि) | ७२ | ७३ | १४५ |
| ३ | तृतीय वर्ष बी.एस्सी (कृषि) | ७२ | ७३ | १४५ |
| ४ | चतुर्थ वर्ष बी.एस्सी (कृषि) | ७८ | ६९ | १४७ |
| | **एकुण** | **३००** | **२८८** | **५८८** |

**पदव्युत्तर अभ्यासक्रम वसतिगृह**

| अ.न | तपशील | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथमवर्ष एम. एस्सी (कृषि) | २४ | १४ | ३८ |
| २ | व्दितीय वर्ष एम. एस्सी (कृषि) | ३० | १४ | ४५ |
| | **एकुण** | **५४** | **२९** | **८३** |

## २.५ राष्ट्रीय छात्र सेना

कृषि महाविद्यालय, कोल्हापूरची राष्ट्रीय छात्र सेना ही ५६ महा.बटालियन एन.सी.सी. कोल्हापूर अंतर्गत कार्यरत आहे. या वर्षाची सुरुवात दि. ०८ ऑगस्ट रोजी लेप्ट. सुनिल फुलसावंगे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. एकुण १८ छात्रांची निवड प्रथम वर्षासाठी करण्यात आली. यामध्ये ०६ मुली व १२ मुलांचा समावेश होतो. सन २०१६-१७ यावर्षी एकुण ५२ छात्र यामध्ये प्रथम वर्षासाठी व्दितीय वर्षासाठी २६ आणि तृतीय वर्षासाठी १८ छात्रांचा समावेश आहे.

कृषि महाविद्यालय, कोल्हापूर एन.सी.सी. तुकडीचा Junior Under Officer म्हणून गावीत कृपेश यांची तर Sarjant म्हणून वाळके रोहित यांची निवड केली. सन २०१६-१७ सालात १६ छात्रानी C सर्टिफिकेट तर १८ छात्रांनी B सर्टिफिकेट परिक्षा दिली

सदरील वर्षात एन.सी.सी कॅडेटस कडून विविध उपक्रमात सहभाग नोंदविला गेला. त्यापैकी काही विशेष कार्यक्रम खाली नमुद केले आहे.

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रम | ठिकाण | छात्र संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | २ जुलै, २०१६ | वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन | उद्यानविद्या प्रक्षेत्र, कृषि महाविद्यालय, कोल्हापूर | ३२ |
| **अ.क्र.** | **दिनांक** | **कार्यक्रम** | **ठिकाण** | **छात्र संख्या** |
| २. | १६ जुलै, २०१६ | वृक्षारोपन, रोटरी क्लब, कोल्हापूर | कृषि महाविद्यालय, कोल्हापूर | ११ |
| ३. | १५ ऑगस्ट २०१६ | स्वातंत्र्य दिन सोहळा, ध्वजाचा सन्मान व वृक्षारोपन | | ५२ |
| ४. | २४ ऑगस्ट २०१६ | प्रथम वर्षासाठी छात्राची निवड आणि डॉ. साजी अब्रहम, कंमाण्डींग ऑफीसर, ५६ महा बटालियन, कोल्हापूर | | |
| ५. | ७ ते १६ सप्टेंबर २०१६ | ATC-Camp मध्ये सहभाग | एन.सी.सी भवन कोल्हापूर | १५ |
| ६. | २ ऑक्टो २०१६ | महात्मा गांधी जयंती | कृषि महाविद्यालय, कोल्हापूर | ५२ |
| ७. | १७ ते १६ जानेवारी २०१६ | पल्स पोलीओ अभियान | कोल्हापूर | १२ |

## २.६ राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.)

सन २०१५-१६ वर्षात एकुण २४७ (१३० मुली, ११७ मुले) स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला होता. पर्यावरणाच्या माध्यमातून नैसर्गिक साधनसंपत्त् ी, संस्कृती व इतिहासाचे संरक्षण या विषयास अनुसरुन राष्ट्रीय सेवा योजनेचा (रा.से.यो.) वर्षभरातील कार्यक्रम खलीलप्रमाणे आयोजित करण्यात आला होता.

नियमीत कार्यक्रम :

राष्ट्रीया सेवा योजनाच्या माध्यमातून स्वयंसेकांनी महाविद्यालयीन परिसरात वृक्षारोपण, रस्त्याची किरकोळ दुरुस्ती, आंबा लागवड, प्लॅस्टीक मुक्ती, वसतिगृह परिसर स्वच्छता, धन्वंतरी उद्यानाची स्वच्छता इत्यादी विविध उपक्रमातून श्रमदान केले. श्रमदानाव्यतिरिक्त राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांनी छत्रपती शाहू महाराज जयंती, महात्मागांधी जयंती, शिक्षक दिन,रक्तदान शिबि, विना वाहन दिवस देखील उत्साहात साजरे केले. विद्यार्थांसाठी सन २०१६-१७ या वर्षात विविध मान्यवर व्यक्तींची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित केली गेली.

**विशेष श्रमसंस्कार शिबिर :**

सन २०१६-१७ वर्षाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे वसगडे, ता.करवीर येथे दि. ०४ मार्च ते ०९ मार्च २०१७ मध्ये घेण्यात आले होते. शिबीराचे ध्येयवाक्य पाणी व्यवस्थापन हेच तरुणांचे ध्येय हे होते. शिबिरात एकुण १२६ (७३ मुली ५३ मुले) विद्यार्थ्यंनी सहभाग नोंदविला होता. शिबिराला उद्‌घाटक म्हणून डॉ.जी.जी खोत, सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, कोल्हापूर हे लाभले होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. संजय शिंदे, उपजिल्हाधिकारी कोल्हापूर हे उपस्थित होते. शिबिरातील कार्यक्रम ०४ सत्रात गटचर्चा बौध्दिके व तज्ञांची व्याख्याने यं ाचा अंतर्भाव करण्यात आला होता. शिबिरामध्ये गावकऱ्यांचे गावकऱ्यांचे आरोग्य सर्वेक्षण करण्यात आले. शिबीरातील विद्यार्थी शरीराने व मनाने व बुध्दीने सशक्त तयार करण्यासाठी गटचर्चा, वादविवाद, वक्तृत स्पर्धा, सामान्य ज्ञान, अंताक्षरी अणि मैदानी खेळांचा अंतर्भाव करण्यात आला होता. . शिबीराच्या कालावधीत कृषि व सामाजिक क्षेत्रातील नामवंत तज्ञांना आमंत्रित करुन समाज घडविण्यात युवकाचे योगदान, मुलींचे मृत्यु प्रमाण, शेतकरी आत्महत्या, स्वाईन फ्ल्यु, आरोग्य व आहार, दुभत्या जनावरांच्या प्रजनन संदर्भातील समस्या व उपाय, पाणी वाचवा, माती परिक्षणाचे महत्व, कृषि तंत्रज्ञानाचे महत्व, पिकांचे एकात्मिक कीड व्यवस्थापन, हुमणी किडीचे व्यवस्थापन व पाचट व्यवस्थापन व ऊस लागवड इ विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

शिबीराचा सांगता समारंभ सरपंच, वसगडे ग्राम स्वच्छता अभियान आरोग्य शिबिर सौ.अर्चना पाटिल व श्री. संजय शिंदे, उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या प्रमुख उपस्थितीत व डॉ.गजानन खोत, सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडला.

## २.७ क्रीडावृत्त

## विद्यार्थ्यांचे विविध उपक्रम -

**सन २०१६-१७ या वर्षात कृषि महाविद्यालय, कोल्हापूर च्या विद्यार्थ्यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत व आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभाग नोंदविला त्यांनी संपादन केलेले यशाचा तपशिल पुढील प्रमाणे :-**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन खेळांची सुरूवात कृषि महाविद्यालय, मालदांड येथे दि. १५ व १६ जुलै, २०१६ रोजी झाली. या सत्रामध्ये बुध्दीबळ (मुले/ मुली) व मलखांब या खेळांचा समावेश करणेत आला होता. या स्पर्धामध्ये या महाविद्यालयाच्या **बुध्दीबळ (मुले/ मुली) व मलखांब या संघांने तृतीय क्रमांक संपादन केले.**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा कृषि महाविद्यालय, शाहदा येथे दि. २७ व २८ जुलै, २०१६ रोजी आयोजीत करणेत आल्या होत्या. या स्पर्धांमध्ये टेबल टेनिस (मुले/मुली) व बॅडमिन्टन (मुले/मुली) या खेळांचा समावेश करणेत आला होता. या स्पर्धांमध्ये या महाविद्यालयाच्या **टेबल टेनिस (मुले) या संघांने तृतीय क्रमांक संपादन केले.**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा कृषि महाविद्यालय, वडाळा येथे दि. ०३ व ०४ ऑक्टोबर, २०१६ रोजी आयोजीत करणेत आल्या होत्या. या स्पर्धांमध्ये व्हॉलीबॉल (मुले/मुली) या खेळाचा समावेश करणेत आला होता. या स्पर्धामध्ये या महाविद्यालयाच्या व्हॉलीबॉल (मुली) संघांने उपविजेतेपद संपादन केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा कृषि महाविद्यालय, बारामती येथे दि. २४ व २५ ऑक्टोबर, २०१६ रोजी आयोजीत करणेत आल्या होत्या. या स्पर्धांमध्ये मैदानी स्पर्धा (मुले/मुली) या खेळाचा समावेश करणेत आला होता. या स्पर्धेमध्ये उंच उडी या प्रकारामध्ये श्री. एस.एस. बन्ने याने तृतीय क्रमांक संपादन केला.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा, मध्यवर्ती परिसर, राहुरी येथे दि. ०३ नोव्हेंबर, २०१६ रोजी आयोजीत करणेत आल्या होत्या. या स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा तपशिल खालीलप्रमाणे,

**<u>वादविवाद स्पर्धा</u>**

1. "भारत का समग्र विकास केवल सहकारिताओ के माध्यम से ही संभव है". या विषयामध्ये श्री. शतानंद लोमटे याने प्रथम क्रमांक पटकाविला.(इंग्रजी ) तर कु. दिक्षा गुरव हिने व्दितीय क्रमांक पटकाविला. (हिंदी ).
2. "पर्यावरण सरक्षण के प्रति महिलाएं पुरूषो की अपेक्षा अधिक सचेत है". या विषयामध्ये कु.पुजा दुधुस्कर हिने प्रथम क्रमांक पटकाविला.(इंग्रजी,विरूध्द) तर कु. प्रियांका शेवाळे हिने व्दितीय क्रमांक पटकाविला.(इंग्रजी,सोबत)

**<u>वक्तृत्व स्पर्धा</u>**

1. "क्या पश्चिमी जगत का पतन हो रहा है ? यदि हॉ , क्यो ? इससे हम क्या सीख ले सकते है" या विषयामध्ये कु. दिक्षा गुरव हिने प्रथम क्रमांक पटकाविला. (हिंदी) तर कु. प्रियांका शेवाळे हिने व्दितीय क्रमांक पटकाविला.(इंग्रजी )

2. "एक्स चान्सलर,पी.सी. अलेक्सझान्डर " या विषयामध्ये श्री. जयंतकुमार काटकर याने प्रथम क्रमांक पटकाविला. (मराठी)
3. "अन्टी डाव्हरी मुव्हमेन्ट, मुबंई " " या विषयामध्ये श्री. जयंतकुमार काटकर याने प्रथम क्रमांक पटकाविला. (मराठी)
4. "हिंदु कोड बिल : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मानस आणि वास्तविकता" या विषयामध्ये श्री. पवन मुंडे याने व्दितीय क्रमांक पटकाविला. (मराठी)
5. "स्त्री शिक्षणाचे उदगाते : महात्मा ज्योतीबा फुले " या विषयामध्ये कु. नम्रता पानकुळे हिने प्रथम क्रमांक पटकाविला. (मराठी)

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा कृषि महाविद्यालय, जैनापूर येथे दि. १८ व १९ डिंसेबर, २०१६ रोजी घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये कुस्ती, वजण उचलणे व शरीरसौष्ठव या खेळांचा समावेश करणेत आला होता. **या स्पर्धामध्ये या महाविद्यालयाच्या वजन उचलणे व शरीर सौष्ठव संघाने सर्वसाधरण विजेतेपद संपादन केले.** कुस्तीमध्ये श्री.एस.ए.माने, या खेळाडूने ७० कि. वजणी गटात प्रथम क्रमांक संपादन केले. वजण उचलणे स्पर्धेमध्ये श्री. के. जे. शेळके या खेळाडूने ५६ कि. वजणी गटात व्दितीय क्रमांक सपांदन केले. श्री. के.एम.दिघे या खेळाडूने ६२ कि. वजणी गटात तृतीय क्रमांक संपादन केले. सर्वश्री एस.ए.माने व ए.आर.भारगुडे या खेळाडूने ६९ कि. वजणी गटात अनुक्रमे व्दितीय व तृतीय क्रमांक सपांदन केले. सर्वश्री ए.एस.जाधव व जी.बी.टीगरे या खेळाडूंनी ७७ कि. वजणी गटात अनुक्रमे प्रथम व व्दितीय क्रमांक सपांदन केले. श्री डी.एस.ढेकणे या खेळाडूने ९४ कि. वजणी गटात तृतीय क्रमांक सपांदन केले.

शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये श्री.पी.एस.वाघमारे या खेळाडूने ६५ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक संपादन केले. तसेच श्री.एस.व्ही.बोराटे या खेळाडूने ७५ किलो वजनी गटात तृतीय क्रमांक संपादन केले. **श्री.पी.एस.वाघमारे या खेळाडूंने सन २०१६ -२०१७ सालचा "महात्मा फुले कृषि विद्यापीठ श्री" व "कृषि श्री " हा किताब पटकाविला.**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन अविष्कार स्पर्धा- २०१७ डॉ. अण्णा साहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, राहुरी येथे दि. १७ व १८ जानेवारी, २०१७ रोजी आयोजीत करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये पी. एस. मुंडे या विद्यार्थ्याने ह्युमॅनीटी, लॅग्वेजेस व फाईन आर्ट या विषयामध्ये व्दितीय क्रमांक संपादन केले.

## आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा

आंतरविद्यापीठ युवक महोत्सव (इंद्रधनुष्य) स्पर्धा बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे दि.०५ ते०९ नोव्हेंबर, २०१६ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये सर्वश्री जी.बी. टिंगरे, जे.जे.काटकर, पी. एस. मुंडे, ए.एन. शेळकांडे, आर.एस. खराडे, एम.पी.गेडाम, कु. एस.एस. भोसले, कु. एस. एस. शिंदे कु. यु.डी.येवले, आणि कु. एस. एस. चौधरी या विद्यार्थ्यांनी औरंगाबाद येथे झालेल्या आंतरविद्यापीठ युवक महोत्सव (इंद्रधनुष्य) स्पर्धेमध्ये म.फु.कृ.वि. राहुरी संघांचे प्रतिनिधित्व केले.

२० व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ अश्वमेध २०१६ क्रीडा स्पर्धा डॉ.वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दि.२७ नोव्हेंबर २०१६ ते १ डिसेंबर २०१६ या कालावधीत पार पडल्या. श्री. एस. ए. माने व कु. पी. बी. लव्हटे या खेळाडूंनी कबड्डी (मुले/मुली) या स्पर्धेत म. फु. कृ. वि. राहुरी संघाचे प्रतिनीधीत्व केले.

कु. एस. एस. नायकवडी व कु. व्ही. के. मुसळे या खेळाडूंनी खो-खो (मुली) या स्पर्धेत म. फु. कृ. वि. राहुरी संघाचे प्रतिनीधीत्व केले.

कु. व्ही. एस. सरनोबत या खेळाडूंनी व्हॉलीबॉल (मुली) या स्पर्धेत म. फु. कृ. वि. राहुरी संघाचे प्रतिनीधीत्व केले.

श्री. ए. यु. गांगुर्डे व कु. वर्षा के. वासुदेवन या खेळाडूंनी बास्केटबॉल ( मुले/मुली) या स्पर्धेत म. फु. कृ. वि. राहुरी संघाचे प्रतिनीधीत्व केले.

कुलपती डॉ. पी.सी. अलेक्झांडर आंतरविद्यापीठ वक्तृत्व स्पर्धा पुणे विद्यापीठ, पुणे येथे दि.२० डिंसेबर,२०१६ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये श्री.जे.जे.काटकर या विद्यार्थ्याने म. फु. कृ. वि. राहुरी संघाचे प्रतिनीधीत्व केले. या स्पर्धेमध्ये श्री.जे.जे.काटकर याने तृतीय क्रमांक सपांदन केले.

ॲन्टी डाव्हरी मुव्हमेन्ट आंतरविद्यापीठ वक्तृत्व स्पर्धा मुंबई येथे दि.१२ जानेवारी, २०१७ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये श्री.जे.जे.काटकर या विद्यार्थ्याने म. फु. कृ. वि. राहुरी संघाचे प्रतिनीधीत्व केले. या स्पर्धेमध्ये श्री.जे.जे. काटकर याने प्रथम क्रमांक सपांदन केले.

आंतरविद्यापीठ अविष्कार स्पर्धा- २०१७ नांदेड येथे दि. २७ ते २९ जानेवारी, २०१७ रोजी आयोजीत करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये पी. एस. मुंडे या विद्यार्थ्याने अविष्कार स्पर्धेत म. फु. कृ. वि. राहुरी संघाचे प्रतिनीधीत्व केले.

श्री. पी.बी.पाटील या खेळांडूने पंजाब विद्यापीठ, चंदीगड येथे दि. ०३ ते ०५ फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत झालेल्या आंतरविरद्यापीठ मलखांब स्पर्धेत म. फु. कृ. वि. राहुरी संघाचे प्रतिनिधीत्व केले.

श्री. एस.आर.वरघुडे या खेळाडूंने गुजरात विद्यापीठ, गुजरात येथे दि. ०५ ते ०८ फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत झालेल्या आंतरविरद्यापीठ टेबल टेनीस या स्पर्धेत म. फु. कृ. वि. राहुरी संघाचे प्रतिनिधीत्व केले.

सर्वश्री. ए.एस.जाधव, जी.बी. टिंगरे, एस.ए.माने, के.जे. शेळके आणि पी.एस.वाघमारे या खेळाडूंने पंजाब विद्यापीठ, चंदीगड येथे दि. ०५ ते ०८ फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत झालेल्या आंतरविरद्यापीठ वजन उचलणे व शरीर सौष्ठव स्पर्धेत म. फु. कृ. वि. राहुरी संघाचे प्रतिनिधीत्व केले.

आंतरविद्यापीठ युवक महोत्सव (ॲग्रीयुनीफीस्ट) स्पर्धा राजस्थान विद्यापीठ, बिकानेर येथे दि. २२ ते २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये सर्वश्री जी.बी. टिंगरे, जे.जे.काटकर, ए.एन. शेळकांडे, आर.एस. खराडे, कु. एस. एस. शिंदे, कु. यु.डी.येवले, आणि कु. एस. एस. चौधरी या विद्यार्थ्यांनी बिकानेर येथे झालेल्या आंतरविद्यापीठ युवक महोत्सव (ॲग्रीयुनीफीस्ट) स्पर्धेमध्ये म.फु.कृ.वि. राहुरी संघांचे प्रतिनिधित्व केले. **कु. एस. एस. चौधरी हिने कार्टुनींग स्पर्धेत चतुर्थ क्रमांक संपादन केला.**

श्री. एस.ए.माने या खेळाडूने पंजाब विद्यापीठ, सिरसा येथे दि.२५ ते २७ फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत झालेल्या आंतरविरद्यापीठ कुस्ती स्पर्धेत म. फु. कृ. वि. राहुरी संघाचे प्रतिनिधीत्व केले.

## विद्यार्थी परिषद

विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास व्हावा त्यांचे अंगी शिस्त व बंधुभाव वृध्दिंगत व्हावेत या उद्देशाने म. फु. कृ. विद्यापीठाने विद्यार्थी परिषदेची घटना तयार केली आहे. त्यानुसार या महाविद्यालयाच्या सन २०१६-१७ सालच्या विद्यार्थी परिषदेची स्थापना दि.२० सप्टेंबर २०१६ रोजी करणेत आली. सुसंगत कामकाजाच्या दृ्ष्टीने विविध समित्या स्थापण करणेत आल्या असून त्या समित्यांचे निमंत्रक व सदस्य पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | समितीचे नाव | नोंदणी क्र | विद्यार्थ्याचे नाव | |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ३ | |
| १. | **कार्याध्यक्ष, विद्यार्थी परिषद** | K- 14/150 | कु. रेग्झीन डोलमा | - |
| २. | **वार्षिक पारितोषिक वितरण समिती** | K-14/067 | १. कु. जाधव मोहीनी अपासो | (निमंत्रक) |
| | | K-16/103 | २. कु. कोकाटे गीतंजली विष्णू | (सदस्य) |
| | | K-15/203 | ३. कु. सिदनाळे प्राची सजंय | (सदस्य) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | K-14/118 | ४. श्री. मुडे पवन श्रीकुमार | (सदस्य) |
| ३. | **क्रीडा व तत्सम कार्यकारी समिती** | K-14/135 | १. कु. पवार प्रज्ञा दादासाहेब | (निमंत्रक) |
| | | K-15/190 | २. कु. वर्षा के वासुदेवन | (सदस्य) |
| | | K-16/048 | ३. श्री. गायकवाड ईश्वर दशरथ | (सदस्य) |
| | | K-14/107 | ४. श्री. माने सौरभ अशोक | (सदस्य) |
| ४. | **शैक्षणीक वादविवाद व सांस्कृतीक समिती** | K-14/ 183 | १. कु. तामीडेला मीरा देवी | (निमंत्रक) |
| | | K-15/065 | २. कु. गावडे अनुराधा भानुदास | (सदस्य) |
| | | K-14/023 | ३. कु. भोसले श्र्वेता संजीव | (सदस्य) |
| ५. | **नियतकालीक, वाचनालय व ग्रंथालय** | K-15/090 | १. कु. कुरणे प्रनाली बाळासो | (निमंत्रक) |
| | | K-15/147 | २. श्री. सजीब बाल सामंत | (सदस्य) |
| | | K-14/051 | ३. श्री.गावीत कृपेश सुभाष | (सदस्य) |
| ६. | **वसतीगृह व उपहारगृह** | K-14/016 | १. कु. बावीसकर सुरभी राजेंद्र | (निमंत्रक) |
| | | K-16/189 | २. कु. सुयवंशी जानव्ही सतीश | (सदस्य) |
| | | K-15/006 | ३. कु. अन्सा एस. हमीद | (सदस्य) |
| ७. | **विद्यार्थी सहकारी ग्राहक मंच** | K-14/083 | १. कु. कलुरू वैष्णवी | (निमंत्रक) |
| | | K- 16/011 | २. कु. बडाला ज्योती | (सदस्य) |
| | | K- 16/062 | ३. श्री. गोदास वेमापवन कल्याण | (सदस्य) |
| ८. | **नोकरी कक्ष स्थापना** | K-15/123 | १. कु. निकम महेश्वरी संजय | (निमंत्रक) |
| | | K-16/129 | २. कु. नेरेला सरवती | (सदस्य) |
| | | K-16/157 | ३. कु. पोशम पवित्रा रेड्डी | (सदस्य) |

## सांस्कृतिक कार्यक्रम

वसंतराव नाईक यांची जयंती दि. ०१ जुलै, २०१६ रोजी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून साजरी करणेत आली. यानिमित्ताने वृक्षारोपनाचा कार्यक्रम मा. डॉ. जी. जी. खोत, सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, कोल्हापूर यांचे हस्ते करणेत आला. याप्रसंगी प्राध्यापक, कर्मचारी वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती दि. २३ जुलै, २०१६ रोजी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून साजरी करणेत आली.

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती दि. ०१ ऑगस्ट, २०१६ रोजी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून साजरी करणेत आली.

क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती दि. ०३ ऑगस्ट, २०१६ रोजी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून साजरी करणेत आली.

सदभावना दिनानिमीत्त दि. २० ऑगस्ट, २०१६ रोजी सामूहिकपणे सदभावना प्रतिज्ञा घेणेत आली.

पदमश्री विठ्ठलराव विखे पाटील यांची जयंती दि. २९ ऑगस्ट, २०१६ रोजी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून साजरी करणेत आली.

सालाबादप्रमाणे सार्वजनिक गणेशोत्सव मोठया उत्साहपुर्ण व आनंदी वातावरणात साजरा करणेत आला. दि. ०५ ते १० सप्टेंबर, २०१६ रोजी श्रींच्या मुर्तीची प्रतिष्ठापणा डॉ. जी. जी. खोत, सहयोगी अधिष्ठाता तथा अध्यक्ष, विद्यार्थी परिषद, कृषि महाविद्यालय, कोल्हापूर यांचे हस्ते जिमखाना हॉलमध्ये करणेत आली.

दि. ०६ सप्टेबर, २०१६ रोजी शिक्षक दिन उत्साहपूर्ण् वातावरणात साजरा करणेत आला. यादिवशी सकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे काम पाहिले.

महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती दि. ०२ ऑक्टोबर, २०१६ रोजी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून साजरी करणेत आली.

पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती दि. १४ नोव्हेंबर, २०१६ रोजी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहारघालून साजरी करणेत आली.

इंदिरा गांधी यांची जयंती दि. १९ नोव्हेंबर, २०१६ रोजी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहारघालून साजरी करणेत आली.

तसेच राष्ट्रीय एकात्मता दिनाच्या निमीत्ताने सामूहिकपणे राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेणेत आली.

भारतीय संविधान दिन दि. २६ नोव्हेंबर, २०१६ रोजी साजरा करणेत आला. यानिमीत्ताने भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करणेत आले.

महात्मा ज्योतिबा जोतीबा फुले यांची पुण्यतिथी दि. २८ नोव्हेंबर, २०१६ रोजी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहारघालून साजरी करणेत आली.

सावित्रीबाई फुले यांची जयंती दि. ०३ जानेवारी, २०१७ रोजी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून साजरी करणेत आली.

जिजाऊ माँसाहेब यांची जयंती दि. १२ जानेवारी, २०१७ रोजी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून साजरी करणेत आली.

सालाबादप्रमाणे मकर संक्रांती निमीत्त दि. १६ जानेवारी, २०१७ रोजी तिळगुळ वाटप कार्यक्रम आनंदी व स्नेहपूर्ण वातावरणात साजरा करणेत आला

नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती  दि. २३ जानेवारी, २०१७ रोजी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून साजरी करणेत आली.

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती दि. १९ फेब्रुवारी, २०१७ रोजी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून तसेच ज्योत प्रज्वलीत करुन मोठया उत्साहात साजरी करणेत आली.

थोर समाजसुधारक महात्मा फुले यांची  जयंती दि. ११ एप्रील, २०१७ रोजी  त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून साजरी करणेत आली.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती दि. १४ एप्रील, २०१७ रोजी त्यांच्या  प्रतिमेस पुष्पहार घालून साजरी करणेत आली.

दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस दि. २१ मे, २०१७ रोजी साजरा करणेत आला. यानिमित्ताने सामूहिकपणे दहशतवाद व हिंसाचार विरोधी शपथ घेणेत आली.

## राष्ट्रीय सण

**भारतीय** स्वातंत्र्यदिनाचा वर्धापन दिन दि. १५ ऑगस्ट, २०१६ रोजी महाविद्यालयाच्या मुख्य कार्यालयाच्या आवारात मा. डॉ. जी. जी. खोत, सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, कोल्हापूर यांचे हस्ते ध्वजारोहन करून साजरा करणेत आला. याप्रसंगी प्राध्यापक, कर्मचारी वृंद व  विद्यार्थी यांनी राष्ट्रीय ध्वजास मानवंदना दिली.

भारतीय प्रजासत्ताक दिनाचा वर्धापन दिन दि. २६ जानेवारी, २०१७ रोजी महाविद्यालयाच्या मुख्य कार्यालयाच्या आवारात डॉ. जी. जी. खोत, सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, कोल्हापूर यांचे हस्ते ध्वजारोहण करून करणेत आला. याप्रसंगी प्राध्यापक, कर्मचारी वृंद, विद्यार्थी व राष्ट्रीय छात्रसेना यांनी राष्ट्रीय ध्वजास मानवंदना दिली.

महाराष्ट्र दिनाचा वर्धापन दिन दि.१ मे, २०१७ रोजी महाविद्यालयाच्या मुख्य कार्यालयाच्या आवारात डॉ. आर. आर. सुर्यवंशी, सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, कोल्हापूर यांचे हस्ते ध्वजारोहण करुन साजरा करणेत आला. याप्रसंगी प्राध्यापक, कर्मचारी वृंद व  विद्यार्थी  यांनी राष्ट्रीय ध्वजास मानवंदना दिली.

## वार्षिक पारितोषिक वितरण व विविध गुणदर्शन कार्यक्रम २०१६-१७

सन २०१६-२०१७ चे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ दि. ०६ एप्रिल, २०१७ रोजी मुख्य कार्यालयांच्या पाटीमागील बाजुस घेणेत आला. पारितोषिक वितरण समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री.

इद्रंजित देशमुख, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. जी. जी. खोत, सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, कोल्हापूर यांनी भुषविले. यावेळी प्रमुख पाहुणे मा. श्री. इद्रंजित देशमुख, यांचे शुभहस्ते पारितोषिक वितरण करणेत आले.

दि.०७ एप्रिल, २०१७ रोजी विविध गुण दर्शन कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले होते. यामध्ये नाटक, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, फुड स्टॉल, शेला पागोटे, गाणी, नुत्य यामध्ये सर्व विद्यार्थ्यानी सहभाग घेवुन उत्साहपुर्ण वातावरणात कार्यक्रम पार पडला.

**२.११ ग्रामिण कृषि कार्यानुभव कार्यक्रम**

सातव्या सत्रातील विद्यार्थ्यांसाठी सुधारीत ग्रामिण कृषि कार्यानुभव कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना ५ महिने शेतकऱ्यांकडे राहून त्यांच्या शेती व्यवसायाचा अभ्यास करावा लागतो. तसेच त्याला कृषि उद्योग, कृषि निगडीत संस्था व कृषि संशोधन संस्थाना भेटी देवून माहिती घ्यावी लागते. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शेतावरील कामाचा अनुभव घेता येतो व शेतीशी निगडीत समस्यांची जाण होते व त्या निराकरण करण्याचा आत्मविश्वास येतो. सन २०१६-१७ या वर्षात एकुण २०२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शेतकऱ्यांचे मागणीनुसार शेती, शेतीपुरक व्यवसायासबंधी परिसंवाद गटचर्चा आणि शेतकरी मेळाव्यांचे आयोजनही विद्यार्थी सबंधित गावात करतात. सन २०१६-१७ या वर्षात ५३६ कृषि प्रात्याक्षिके, १२३ गटचर्चा, शेतकरी मेळावे, जैविक खत वितरण ६०४ किलो, महिला प्रशिक्षण कार्यक्रम ०४ व शास्त्रज्ञांच्या भेटीचे आयोजन ४० गावात करण्यात आले.

**२.१२ कार्यानुभवतून व्यावसायिक शिक्षण**

आठव्या सत्रामध्ये कार्यानुभवातून व्यावसायिक शिक्षण कृषि महाविद्यालयातील ७ विभागामार्फत राबविण्यात येतो. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी करायला शिक्षणे, शिकण्यासाठी करणे जगण्यासाठी कमविणे व सेवेसाठी जगणे ही संकल्पना आहे. कृषि महाविद्यालयात १. मृद व जल परिक्षण चिकित्सालय, २. जैविक खत उत्पादन ३. रोपवाटीका व्यवस्थापन/भाजीपाला उत्पादन ४.जैविक किडनाशक उत्पादन ५. बिजोत्पादन व बीज प्रक्रिया ६. दुग्ध व दुग्ध पदार्थ निर्मिती ७. कृषि यांत्रिकीकरण असे सात मोडयुल सुरु असून प्रत्येक मोडयुलमध्ये २५-३० विद्यार्थी सहभागी होतात व कार्यानुभवातून व्यावसायिक शिक्षण मिळवतात. सन २०१६-१७ वर्षातील कार्यानुभवातून शिक्षण या कार्यालयांतर्गत भाजीपाला उत्पादन निधीतून २९१११ रुपये, दुग्धजन्य पदार्थातुन ७५००० रुपये जैविक खत निर्मितीतुन १.५ लाख व माती परिक्षणातून ३५०००/- रुपयांचे उत्पन्न मिळविले.

### २.१३ विद्यार्थी सहकारी भं ाडार

कृषि महाविद्यालयातील कृषि अर्थशास्त्र विभागामार्फत विद्यार्थी सहकारी भांडार चालविण्यात येत असून विद्यार्थ्यांना फाईल कव्हर, ड्रॉईंग शीट्स, जर्नल शीटचा पुरवठा केला जातो. या भांडाराची कृषि अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक, अध्यक्ष तर सहाय्यक प्राध्यापक सांखिकी व गणित हे सचिव म्हणुन काम पाहतात.

### ३. ग्रंथालय

कृषि महाविद्यालय, कोल्हापूर परिसरात सुसज्ज अशी ग्रंथालयाची इमारत असून सदर ग्रंथालयात शैक्षणिक ग्रंथ तसेच संदर्भ पुस्तके नियतकालिके उपलब्ध आहेत. ग्रंथालयात इंटरनेट सेवा, पुस्तकपेढी सेवा, संदर्भ सेवा, ऑडीओ व्हिडीओ सेवा व कृषि विषयक सीडी इत्यादी सेवा उपलब्ध असून ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी ४० संगणक उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

सन २०१६-१७ या वर्षात ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह खालील प्रमाणे होता.

| | | |
|---|---|---|
| १. | निधी ग्रंथसंग्रह | ४३८६६ |
| २. | पुस्तकपेढी योजना ग्रंथसंग्रह | ८३६५ |
| ३. | सन २०१६-१७ मधील ग्रंथ खरेदी | १७१९ |
| ४. | नियतकालिके | २० |
| ५. | मासिके | २५ |
| ६. | वृत्तपत्रे | १० |
| ७. | प्रबंध | १७५ |
| ८ | ई-बुक्स | १२९ |
| ९. | ई जर्रनल (Cera/Jgate) | १६०६ |
| १०. | सी.डी रोम डाटाबेस (१९७२ ते २०११) | ५५ |

**ग्रंथालय देवघेव :**

२०१६-१७ या कालावधीत कृषि महाविद्यालयातील विद्यार्थी संशोधक कर्मचारी वर्ग सर्व मिळून सुमारे ९८०० वाचकांना वाचन सेवा दिली आहे.

**ग्रंथालयाची प्रगती :**

१. विद्यार्थी व संशोधकांच्या हिताच्या दृष्टीने संगणकावर अद्यावत माहिती मिळवीता यावी या दृष्टीने मागील वर्षाप्रमाणे याहीवर्षी बीएसएनएल बॅाडबॅड इंटरनेट जोडणी केलेली आहे.

२. पदवी  व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनकरीता क्रमीक व संदर्भ पुस्तके खरेदी केली गेली.

३. J-Gate, Cera, Indiastat.com या सारख्या ई सेवा पदव्युत्तर विद्यार्थ्यांना संशोधनाकरीता पुरवल्या.

४. KOHA या संगणक प्रणालीमध्ये पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी, स्टाफ यांची नोंद करुन घेतली.

५. विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त ई-सेवा पुरवण्यात आलेल्या आहेत.

ग्रंथालय बळकटीकरण योजना अनुदानामधुन खरेदी केलेल्या साहित्याचा तपशिल सन २०१६-१७ अनुदान रु. ४,००,०००/-

| अ.क्र | साहित्याचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| १. | संदर्भ व क्रमीक पुस्तके | रु. ०२,७८,७३२/- |
| २. | इंटरनेट वार्षिक वर्गणी-बीएसएनएल बॉडबॅन्ड | रु. २५,८७५/- |
| ३. | KOHA ही संगणक प्रणाली (वार्षिक देखभाल करार) | रु. ५९,८००/- |
| ४. | IGP : ECMS संगणक प्रणाली (वार्षिक देखभाल करार) | रु. ३४,५००/- |
| | | रु. ३,९८,९०७/- |

विद्यापीठ बळकटीकरण योजना अनुदानामधुन खरेदी केलेल्या साहित्याचा तपशिल

सन २०१६-२०१७

| अ.क्र. | साहित्याचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| १. | पीव्हीसी कार्पेट मॅट | रु. ९५,०००/- |
| २. | इंडिया स्टॅयाट वेबसाईड : वार्षिक वर्गणी | रु. ९०,९९४/- |

| | | |
|---|---|---|
| ३. | SHARP & W झेरॉक्स मशीन खरेदी | रु. ७५,०००/- |
| ४. | खिडक्यांनसाठी पडदे | रु. २०,७८६/- |
| ५. | कीर्रलोस्कर मेक जनरेटर (वार्षिक देखभाल करार) | रु. १७,६२७/- |
| ६. | कॅनॉन झेरॉक्स मशीन टोनर | रु. ११,७४०/- |
| ७. | कीर्रलोस्कर मेक जनरेटर बॅटरी | रु. १३,२११/- |
| ८. | आय टी टयुल HHD | रु. ४,३००/- |
| ९. | कॅनॉन झेरॉक्स मशीन (वार्षिक देखभाल करार) | रु. ४,०००/- |
| १०. | कॅनॉन झेरॉक्स मशीन उपकरण खरेदी | रु. ३५००/- |
| | | **रु. ३,३६,१५८/-** |

**ग्रंथालय भेट**

२०१६-१७ या कालावधीत कोल्हापूरातील वेगवेगळया महाविद्यालयातील विद्यार्थी व संशोधकांनी ग्रंथालयास भेट देवून ग्रंथालयातून त्यांना उपयुक्त संदर्भ घेतले असे विद्यार्थी विद्यार्थिनीं व संशोधक शिक्षक यांची सुमारे संख्या ९८० पर्यंत आहे.

## ४. कृषि विस्तार

कृषि महाविद्यालयातील विस्तार शिक्षण विभागामार्फत कृषि महाविद्यालय विस्तार गट ०३ तालुक्यामधील ६२ गावामध्ये विस्ताराचे काम केले जाते. त्यामध्ये कृषिदिन, कृषि तंत्रज्ञान सप्राह, शेतकरी मेळावे प्रक्षेत्र भेटी, परिणाम प्रात्याक्षिके, गटचर्चा शिवार फेरी यांचे आयोजन केले जाते. सन २०१५-१६ या वर्षात ७५० घरी व शेतावरील भेटी, १५० गटचर्चा, ४७ शिवार फेरी, ५ शेतकरी मेळावे यांचे आयोजन, ६ कृषि प्रदर्शने करण्यात आले. बिज प्रक्रिया प्रात्याक्षिके, माती व पाणी परीक्षण, आंब्यावर बगल कलमे यं ाची प्रात्याक्षिके घेण्यात आली. तसेच, शेतकऱ्यांना गहू, ज्वारी, हरभरा, ऊस, कारले, भोपळा यांच्या सुधारीत जातीची बियाणे, जिवाणू खते, कलमे व रोपे उपलब्ध करुन देण्यात आले.

| अ.क्र | उपक्रम | संख्या | लाभार्थी |
|---|---|---|---|
| १. | प्रात्याक्षिके व प्रक्षेत्र चाचण्या | २५ | - |
| २. | जिल्हा मासिक चर्चासत्र | ०६ | - |
| ३ | मासिक प्रक्षेत्र भेटी | ११ | २५७ |
| ४ | शेतकरी मेळावे | २५ | ३५७० |
| ५ | शेतकरी अभ्यास सहल | ०१ | २८ |
| ६ | विभागीय विस्तार केंद्रास शेतकरी भेटी | ७२५ | ७२५ |
| ७ | दुरदर्शन कार्यक्रम | १२ | - |
| ८ | आकाशवाणी कार्यक्रम | ०१ | - |
| ९ | प्रकाशने विक्री | १०५० | - |
| १० | शास्त्रज्ञांची व्याख्याने | १६ | ५३१२ |
| ११ | प्रशिक्षण कार्यक्रम | ४३ | २०१० |
| १२ | शेतकरी शास्त्रज्ञ मंच प्रक्षेत्र भेट शिवार फेरी | ११ | ३५७ |
| १३ | फिरते चिकित्सालय | ११३४ | ५६४० |
| १४ | निदान चमू भेटी | १० | २५ |
| १५ | रावे कार्यक्रम | ३८ | ११२० |

ग्रामिण कृषि कार्यानुभव कार्यक्रम ३२ गावे- १८७ विद्यार्थी

| अ.क्र. | उपक्रम | संख्या |
|---|---|---|
| १. | कृती प्रात्याक्षिक | ५६१ |
| २. | गट चर्चा | १२३ |
| ३. | शेतकरी मेळावे | ०३ |
| ४. | माती नमुने तपासणी | ३९४ |
| ५. | लिखित साहित्य | ९३५ |
| ६. | कृषि प्रदर्शन | ०३ |
| ७. | माहिती तंत्रज्ञान प्रसार | ३२ |

| | | |
|---|---|---|
| ८. | प्रशिक्षण | ३२ |
| ९. | जनावरांचे लसीकरण | ०६ |
| १०. | शास्त्रज्ञांचे भेटी | ६५ |

**विभागीय विस्तार केंद्र**

कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथील विभागीय विस्तार केंद्रामार्फत जिल्हयातील शेतकऱ्यांना कृषि तंत्रज्ञान व सुधारीत बियाणे सुधारीत अवजारे उपाब्ध करुन दिले जाते. सन २०१६-१७ या वर्षात विभागीय विस्तार केंद्रामार्फत १४ प्रशिक्षण कार्यक्रम, १६० शेतावरील प्रात्याक्षिके, चर्चा सत्रांना उपस्थिती, वर्तमान पत्रे, रेडीओ व दूरदर्शन कार्यक्रम(६) , शेतावरील भेटी, शिवार फेरी (५), शेतकरी मेळावे(५), कृषि प्रदर्शन(५), शेतकरी सहली, निदान चमू भेटी (१)असे ओक विस्तार कार्यक्रम राबविण्यात आले. शेतकरी शास्त्रज्ञ मंचा मार्फत हंगामनिहाय प्रशिक्षण गटचर्चा , पीक परिसंवाद शेतावरील भेटी, राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत हुमणी नियंत्रण प्रात्याक्षिक, आद्यरेषीय प्रात्याक्षिके, शैक्षणिक सहली या सारखे उपक्रम वर्षभरात राबविण्यात आले. विभागिय विस्तार केंद्रामार्फत राष्ट्रीय कृषि विकास योजनेतर्फे (फार्मर फर्स्ट) मोल निचरा प्रणाली ५० कृति प्रात्यक्षिके आणि १०० एकर क्षेत्रावर उस, भाजीपाला क्षेत्रिय प्रात्याक्षिके घेण्यात आली आहेत.

**विस्तार विकास गट कृषि महाविद्यालय, कोल्हापूर**

| अ.क्र. | उपक्रम | संख्या | लाभार्थी |
|---|---|---|---|
| १. | घरी/शेतावर भेट | ५९० | ३२९८ |
| २. | गट चर्चा | ९७ | ९६७ |
| ३. | शिवार फेरी | ३१ | ३२१ |
| ४. | परिणाम प्रात्याक्षिक- खरीप | | |
| | भात-भोगावती फुले राधा राधानगरी | ४२ | ४२ |
| | सोयाबीन- डीएस २२८ | ६० | ६० |
| ५. | परिणाम प्रात्याक्षिक- रब्बी | | |
| | गहू- त्र्यंबक | २८ | २८ |
| | हरभरा- दिग्विजय | २० | २० |

| | | | |
|---|---|---|---|
| | ज्वारी- फुले चित्रा | २४ | २४ |
| ६. | ऊस- को ८६०३२ | ०८ | ०८ |
| ७ | आंबा बागेचे पुर्नजीवन | ३७ | ०२ |
| ८. | चिक्कू काजू रोपे उपलब्ध | ३४७ | ०२ |
| ९. | जैविक खते उपलब्ध - पीएसबी ट्रायकोडर्मा रायझोबियम इ. | १८० | ८२ |

**कृषि महाविद्यालयाच्या विस्तार गटाची माहिती विस्तार गट: हातकणंगले, भूदरगड व राधानगरी (०३)**

**विस्तार गटामधील गावे**

| अ.क्र. | केंद्राचे नाव | समाविष्ट गावांचे नाव |
|---|---|---|
| १. | हातकणंगले तहसील | आळते, कंुभोज, नेज, हिंगणगाव, गजले |
| २. | साजणी | साजण, कोरोची, हातकणंगले, तिळवणी, कबनूर, माणगाव, माणगाववाडी रुई, तारदाळ इ. |
| ३. | वाठार | वाठार, चावरे, घुणकी, कीणी, भोदाले, पारगाव |
| ४. | नागाव | नागाव, मौजे वडगाव, टोप, संभापूर, कासारवाडी, गिणचे |
| ५. | पाडळी | पाडळी, पाडळी-दरवेश, अंबप, अंबपवाडी, गनपाडळे, तळसंदे |
| ६. | कोल्हापूर | माले, मालेवाडी, रुकडी, अतिग्रे, हेरले, चोकाक, गडमुडशिंगी, हालोंडी इ. |
| ७. | भुदरगड तहसील गारगोटी | गारगोटी, सालपेवाडी, शिंदेवाडी, फणसवाडी, आंबवणे, कलनाकवाडी, खानापूर, हणबरवाडी इ. |
| ८. | राधानगरी तहसील | तुंरबे, कपिलेश्वर, अर्जुनवाडा, तिटवे, कासारवाडा, वाघापूर, चांदरे, गागोली, तळाशी इ. |

## ५. संशोधन

सन २०१६-१७ या वर्षात कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे उद्यानविद्या, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र, कृषि अभियांत्रिकी विभाग वगळता सर्व विभागात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु आहेत. प्रत्येक विभागात पदव्युत्तर संशोधन त्या विभागातील बोर्ड ऑफ स्टडीजच्या निर्देशानुसार सुरु असते. त्या व्यतरीक्त कृषि महाविद्यालयातील विस्तार शिक्षण विभाग, कृषि अर्थशास्त्र विभाग, उद्यानविद्या विभाग, वनस्पतीशास्त्र विभागात विद्यापीठ संशोधन समितीने नेमूण दिलेल्या संशोधन अभ्यास, मल्टीलोकेशन ट्रायल्स सुरु असतात.

## ६. बियाणे व जैविक खतांचे उत्पादन

| अ.क्र. | हंगाम/पिकांचे नाव | जात | अवस्था | क्षेत्र (हे) | उत्पादन (क्वि) |
|---|---|---|---|---|---|
| १. | खरीप भात | इंद्रायणी | पायाभूत | ०२.७५ | २२.०० |
| २. | खरीप भात | इंद्रायणी | प्रमाणित | १.०३ | ७.८० |
| ३. | सोयाबीन | के.एस.१०३ | सत्यप्रत | १.५६ | ८.०७ |
| ४. | सोयाबीन | के.एस.१०३ | पैदासकार | ०.५० | ३.२० |
| ५. | सोयाबीन | के.डी.एस ३४४ | पैदासकर | ५.२४ | ६३.२० |
| ६. | मक्का | क्यु.एम.आय १४०१ | पैदासकार | ०.२० | ४.९० |
| ७. | रब्बी | | | | |
| | गहू | एन आय ए डब्ल्यु ३०१ | प्रमाणित | ३.४७ | ६५.०० |
| | ऊस | वेगवेगळया जाती | पैदासकार | १.८७ | २.०६७०० दोन डोळयाचे टिपरी |
| | उन्हाळी | - | - | - | - |

**जैविक खतांचे उत्पादन**

कृषि महाविद्यालयातील वनस्पती रोगशास्त्र विभागामार्फत विविध जैविक खतांचे उत्पादन केले जाते. सन २०१६-१७ या वर्षातील जैविक खत निहाय उत्पादनाची माहिती खालील तक्त्यात दर्शविली आहे

| **अ.न.** | **खताचे नाव** | **मागील शिल्लक ३१/३/१६** | **उत्पादन व विक्री १/०४/२०११ते ३१/०३/२०१२** | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | **उत्पादन** | **विक्री** | **रक्कम (रु)** |
| १ | अझेटोबॅक्टर | १०.२५० | १०२६ | १०२६ | ४१०४ |
| २ | रायझोबियम | - | ६१२ | ६१२ | २४४८० |
| ३ | पीएसबी | ४०.०० | ३०३१ | ३०३१ | १२१२४० |
| ४ | अझोस्पिरीलीम | - | ३५१.७५० | ३५१.७५० | १४०७० |
| ५ | असेटोबॅक्टर | ३७.००० | ३५७९ | ३५७९ | १४३१६० |
| ६ | ट्रायकोडर्मा | ३.४०० | ८७७ | ८७७ | ४३८५० |
| ७ | डिकापोसिंग कल्चर | १२.४०० | १००९.२५० | १००९.२५० | १५१४३५.०० |
| | **एकूण** | | **११०८५.५००** | **११०८५.५००** | **६२२३३६.००** |
| द्रवरुप जैविक खते | | | | | |
| १. | **ॲसेटोबॅक्टर** | - | ३०६.४०० | **३०६.५०** | **६१३५०** |
| २. | **पी.एस.बी** | - | **२९३.०००** | **२९३.०००** | **५८६५०** |

**७. महसुली उत्पन्न**

कृषि महाविद्यालयातील विविध विभाग व प्रक्षेत्र यांच्यापासून सन २०१६-१७ या वर्षात खालील प्रमाणे महसूली उत्पन्न प्राप्त झाले.

सन २०१६-१७ वर्षातील महसुली उत्पन्न

| अ.न. | तपशील | उत्पन्न (लाख रूपये) |
|---|---|---|
| १. | कृषि विद्या प्रक्षेत्र | १९.७६ |
| २. | दुग्धशास्त्र विभाग | ९.८७ |
| ३. | उद्यानविद्या विभाग | ७.२३ |
| ४. | जेविक खत उत्पादन केंद्र | ६.२२ |
| | **एकूण** | **४३.०८** |

**८. मनुष्यबळ विकास**

१. प्रा.आर.एम.खडतरे, सहाय्यक प्राध्यापक, वनस्पतीरोगशास्त्र विभाग व डॉ.बी.एस.कदम, सहाय्यक प्राध्यापक, मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र यांनी एस.व्ही महाविद्यालय, तिरुपती येथील १० दिवसाच्या (दि.१५-२४ सप्टेंबर, २०१६) प्रशिक्षण कार्यक्रम पुर्ण केला.

२. डॉ.बी.एस.कदम, सहाय्यक प्राध्यापक, मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र यांनी दि. २३.८.२०१६ ते १.९.२०१६ या कालावधीतील भोपाळ येथील प्रशिक्षण वर्गात भाग घेतला.

३. डॉ.डी.एस.पाटील, प्रभारी प्राध्यापक, डॉ.आर.व्ही.कुलकर्णी, सहयोगी प्राध्यापक, प्रा.एस.एम.जगताप, सहाय्यक प्राध्यापक व डा. बी.एस.कदम, सहाय्यक प्राध्यापक, मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र यांनी दि. २०.०८.२०१६ रोजी डॉ.तपस भट्टाचार्य, मा.कुलगुरु, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील व्याख्यानास हजेरी लावली.

४. डॉ. डी.एस.पाटील, प्रभारी प्राध्यापक व डॉ.आर.बी.पवार, सहाय्यक प्राध्यापक, मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र यांनी दि.२२-२३ सप्टेंबर रोजी दापोली येथे भारतीय मृदशास्त्र संस्थेने आयोजीत परिषदेत भाग घेतला.

५. डॉ.व्ही.एस.पाटील, सहाय्यक प्राध्यापक, वनस्पतीरोगशास्त्र यांनी ॲग्रोटुरीझम या विषयावरील प्रशिक्षण दि. ३१ ऑक्टोंबर २०१६ ते ०९ नोव्हेंबर, २०१७ अखेर ICAER केंद्र गोवा येथे पुर्ण केले.

६. डॉ.एस.एस.धुमाळ, सहाय्यक प्राध्यापक, उद्यानविद्या विभाग यांनी दि. ०५-०६ ऑक्टोंबर रोजी अनुभवाधारित समन्वयक म्हणुन आय.ए.आर आय, दिल्ली येथे बैठकीत भाग घेतला.

७. डॉ.एस.एस.धुमाळ, सहाय्यक प्राध्यापक, उद्यानविद्या विभाग यांनी दि. २३-२४ डिसेंबर २०१६ रोजी *लखनऊ येथे आंतरराष्ट्रीय परिषदेत भाग घेतला.*

८. डॉ.व्ही.के.गरांडे, सहयोगी प्राध्यापक, उद्यानविद्या, डॉ.डी.के.कांबळे, प्राध्यापक, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ.डी.डी.पतंगे, सहाय्यक प्राध्यापक, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, श्री.एस.जे.पाटील, सहाय्यक प्राध्यापक, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ.एस.एस.धुमाळ, सहाय्यक प्राध्यापक, उद्यानविद्या विभाग, डॉ.ए.एस.बागडे, सहाय्यक प्राध्यापक, किटकशास्त्र, यांनी दि. ३० नोव्हेंबर, २३०१७ रोजी बेळगावे एज्युकेशन प्रायव्हेट लिमिटेट् सांगली येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिसंवादात भाग घेतला.

९. डॉ.एस.एस.धुमाळ यांनी तेल अवीव इस्त्राईल येथे दि. ५-२४ फेब्रुवारी २०१७ या कालावधीतीत आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण वर्ग पुर्ण केला. त्याच कालावधीत (१६ फेब्रुवारी) त्यांनी डॉ. कीम जेमि, अध्यक्ष जागतिक बॅंक यांच्या उपस्थितीत गोलमेज परिषदेत तज्ञ सदस्य म्हणून भाग घेतला.

१०. डॉ.ए.एस.बागडे, सहाय्यक प्राध्यापक, किटकशास्त्र यांनी UAS, GKVK, बेंगलोर येथे दि. २३ जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत आयोजित केलेले प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केले.

११. डॉ. डी.के.कांबळे, डॉ. डी.डी.पतंगे यांनी आनंद गुजरात येथे दि.४-५ फेब्रुवारी २०१७ मध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत भाग घेतला.

१२. डॉ.आर.आर.सुर्यवंशी, प्राध्यापक, कृषि अर्थशास्त्र डॉ.बी.बी.गावडे, सहयोगी प्राध्यापक, डॉ.एच.आर.शिंदे, वरिष्ठ संशोधन सहाय्यक, श्री. एम.आर.शेवाळ, अर्थशास्त्र, डॉ.व्ही.के.गरांडे, सहयोगी प्राध्यापक, उद्यानविद्या, डॉ.पी.यु.रौंदळ, सहाय्यक प्राध्यापक, कृषिविद्या, श्री. आर.एम.खडतरे, सहाय्यक प्राध्यापक, वनस्पतीरोगशास्त्र विभाग यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे दि. १०-११ फेब्रुवारी २०१७ रोजी आयोजीत केलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत उत्कृष्ट पेपर सादरीकरणासाठी गौरविण्यात आले.

१३. सौ.एम.जे.पाटील, महाविद्यालय ग्रंथपाल यांनी कमला महाविद्यालय, कोल्हापूर येथे आयोजीत केलेल्या दि. २३-२९ डिसेंबर २०१७ रोजी राष्ट्रीय परिसंवादात भाग घेतला.

**९. पारितोषिके/सन्मान**

१. डॉ.एस.एस.धुमाळ, सहा.प्राध्यापक, उद्यानविद्या विभाग यांना लखनौ येथील अंतरराष्ट्रीय परिसंवादात उत्कृष्ट संशोधन लेख व युवा शास्त्रज्ञ पुरस्काराने गौरविण्यात आले.

२. डॉ.व्हि.जे.तरडे, प्रा.एस.ए.पाटील, डॉ.पी.बी.माहिते यांना भीमा प्रतिष्ठाण कोल्हापूर यांना उत्कृष्ट कृषि संशोधक या पुरस्काराने गौरविण्यात आले.

३.डॉ.एम.एस.जाधव, सहाय्यक प्राध्यापक, कृषि अर्थशास्त्र यांचा डॉ.बाळासाहेब कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथे पार पडलेल्या अंतरराष्ट्रीय परिसंवादात उत्कृष्ठ लेख सादरीकरणसाठी गौरविण्यात आले.

**१०. मान्यवरांच्या भेटी :**

- दि. १८.०४.२०१६ रोजी मा. कुलगुरु डॉ.के.पी.विश्वनाथा, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांनी महाविद्यालयास भेट देऊन विविध विभागांची पहाणी केली व मार्गदर्शन केले.
- मा. एस.एम.पुरी, माजी कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, डॉ.वाय.जी.प्रसाद, संचालक, एटीएआरआय, हैद्राबाद, डॉ.आनंद सिन्ह, संचालक, विस्तार शिक्षण, तेलंगणा कृषि विद्यापीठ, हैद्राबाद, डॉ.के.व्हि.प्रसाद, संचालक, फुल शेती आणि डॉ.के.डी.कोकाटे, संचालक विस्तार, मफुकृवि, राहुरी यांनी दि. ०४.०३.२०१७ रोजी कृषि विज्ञान केंद्र सुरु करणेसाठीच्या सुविधा तपासणीसाठी महाविद्यालयास भेट दिली.
- मा.डॉ.बुधाजीराव मुळीक,महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे राज्यपाल नियुक्त सदस्य यांनी दि. २१.०३.२०१७ रोजी भेट दिली.

**११. महत्वाच्या घडामोडी**

**१.** कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे दि. २१ जुन २०१६ आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी अधिकारी, कर्मचारी यांनी सहभाग नोंदवीला.

२. दिनांक २३ जून २०१६ रोजी कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे कृषि शिक्षण दिनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन श्री. संजय पवार, उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे हस्ते झाले. सदर कार्यक्रमात संजय शिंदे, उपजिल्हाधिकारी, सांगली, श्री. सुधर्म जामसडेकर, विभागिय सांख्यिकी, श्री.शीतल बागी, झोनल मॅनेजर, बँक ऑफ महाराष्ट्र, श्री.गुलाबराव धुमाळ, सीमा बायोटेक, श्री. संभाजी माळी, हरीतगृह शेतकरी यांनी उपस्थित असलेल्या ५० विद्यार्थी व पालक यांना कृषि शिक्षण महत्व व रोजगार संधी याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ.जी.जी.खोत यांनी भुषविले.

३. कृषि महाविद्यालय, कोल्हापूर व माजी विद्यार्थी संघटना यांचे संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय राजर्षी शाहू महाराज वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दि. २८-२९ जुन रोजी करण्यात आले होते. त्यामध्ये कृषि महाविद्यालय, कोल्हापूर संघाचे सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

४. कृषि महाविद्यालय कोल्हापूर येथे वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्ताने कृषि दिन व वृक्षारोपन कार्यक्रम दि. ०१ जुलै २०१६ रोजी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. जी. जी. खोत यांचे अध्यक्षतेखाली व श्री. चंद्रशेखर यादव अध्यक्ष रोटरी क्लब, कोल्हापूर यांचे प्रमुख उपस्थितीत पार पडला.

५. कृषि महाविद्यालय परिसरामध्ये दिनांक १६.७.२०१६ रोजी रोटरी क्लब, कोल्हापूर व कृषि महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ.जी.जी.खोत, श्री. चंद्रशेखर यादव, अध्यक्ष, रोटरी क्लब कोल्हापूर व जिल्हा वन अधिकारी श्री. दादासाहेब शेंडे उपस्थित होते.